# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 19/01/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 21 कि. मी अंतरावर मौजा रत्नाकर यांचे घरासमोरील रोडवर लोहारी सावंगा येथे दिनांक 17/01/2021 चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– कु. सवीता बाबाराव चापले, वय 30 वर्ष, रा. लोहारी सावंगा ता. नरखेड जि.नागपूर यांचे जुने घराला लागुन आरोपी क्र. 5) रत्नाकर बाबुराव सावरकर, वय 52 वर्ष याचे घर असुन त्याचे सोबत घराचे जागेवरुन दोन ते तिन वर्षा पासुन वाद विवाद सुरु असून त्यासंबंधाने त्यांचे आपसात कोर्टात केस सुरु आहे. आरोपी क्र. 5 याने फिर्यादी हिचे घराची भिंत फोडुन आपले घराचे कॉलम बांधले होते. त्यामुळे फिर्यादीचा भाऊ शरद बाबाराव चापले, वय 26 वर्ष याने आरोपी क्र. 5 यास म्हटले की, ''माझ्या घराची भिंत फोडुन घराला लागुन कॉलम का बाधंले'' असे हटकले होते. तेव्हा आरोपी क्र. 5) रत्नाकर बाबुराव सावरकर व 4) कल्पना रत्नाकर सावरकर यांनी फिर्यादिचे भावास कॉलर पकडुन ढकल ढुकल करुन शिवीगाळ केली व धमकी दिली होती. तसेच फिर्यादीचा भाऊ शरद चापले हे दि. 17/01/2021 रोजी दुपारी सुमारे 15.00 वा. शेतात गाईंना पाणी पाजण्याकरीता गेले होते. त्यानंतर 15.30 वा. सुमारास फिर्यादीचे भावाला चाकुने मारत आहे अशी माहिती मिळाल्याने फिर्यादी तेथे गेली असता आरोपी क्र. 4) कल्पना रत्नाकर सावरकर वय 45 वर्ष 5) रत्नाकर बाबुराव सावरकर वय 52 वर्ष 6) दिनेश बाबुराव सावरकर वय 50 वर्ष सर्व रा. लोहारी सावंगा ता. नरखेड जि. नागपूर यांनी फिर्यादिचे भावाला पकडुन ठेवले व आरोपी क्र. 1) गौरव रत्नाकर सावरकर वय 19 वर्ष 2) विक्की रत्नाकर सावरकर वय 22 वर्ष, 3) श्रावन किसनजी सावरकर वय 19 वर्ष यांनी शरद बाबाराव चापले(मृतक) यास चाकुने मारुन जखमी केले. त्यास उपचार करिता मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला. अश्या प्रकारे आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीचे भावास मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 143, 147, 148, 149, 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. मंगेश काळे 8380887452 हे करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 21 कि. मी अंतरावर मौजा फिर्यादी यांचे घरासमोरील रोडवर लोहारी सावंगा येथे दिनांक 17/01/2021 चे 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गौरव रत्नाकर सावरकर वय 19 वर्ष रा. लोहारी सावंगा ता.नरखेड जि.नागपूर यांचे घरचे बांधकामचे पील्लर आरोपी नामे– शरद बाबाराव चापले, वय 26 वर्ष, रा. लोहारी सावंगा ता.नरखेड जि.नागपूर याच्या जागेत येत असल्याचे करणावरुन आरोपीने झगडा भांडण केले होते. फिर्यादीचे आई वडिलांनी पोलीस स्टेशन ला रिपोर्ट दिली या कारणावरुन आरोपीने फिर्यादिला व त्याचे आई सौ. कल्पना हिला हातबुक्कीने मारहाण करुन व चाकुने वार करुन गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 324, 323 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक श्री मंगेश काळे 8380887452 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. भिवापुर :– फिर्यादी नामे– संजय देवरावजी समर्थ, वय 35 वर्ष, रा. शंकरपूर तोप चौक, वार्ड नं. 3 ता. चिमुर हे गावोगावी जावून कास्तकारा कडून कापूस विकत घेवून कृषी उत्पन्न बाजार समीती मध्ये कापूस विकण्याचे व्यवसाय करतात. दि. 17/01/2021 दुपारी 01.00 वा. सुमारास कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापूर मधील वंसता देशमुख यांना फिर्यादीने 8 क्वींटल 30 कीलो कापूस विकला व पैसे न घेता गावाला गेले. दुसरे दिवशी दि. 18/01/2021 रोजी सुद्धा फिर्यादी यांनी त्यांचे जवळील 12 क्वींटल 500 कीलो कापूस वंसता देशमुख यांना विकला. फिर्यादी यांनी विकलेल्या दोन्ही कापसाची एकुण किंमत 1,15,140/– रू. व जवळ असलेले 15,000/– रू. असे एकुण 1,30,140/– रू., रिअलमी 7 कंपनीचा मोबाईल कि. 5,000/– रू. असा मुद्देमाल त्यांनी अॅग्रो स्टार लिहीलेल्या काळया रंगाचें बॅगमध्ये ठेवला होता. फिर्यादीने ती बॅग टाटा एस गाडी क्रं. एमएच–34/बीजी–3995 चे ड्रॉयव्हर सीटचे मागे ठेवून ते भिवापूर येथील अन्नपूर्णा कृषी केंद्र येथे फास्पेट यूरीया घेण्याकरीता त्यांनी गाडी उभी केली. फिर्यादी व सोबत असलेला प्रकाश बाबुराव ननावरे हे त्यांनी खरेदी केलेल्या फास्पेट यूरीयाच्या बॅग गाडीचे डाल्यामध्ये टाकण्यास गेले असता तिथे त्यांनी पूर्वी ठेवलेली एकुण कि. 1,35,140/–रू. ची बॅग आढळली नाही. सदरची बॅग हि अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चंद्रकांत रेवतकर मो.न. 9823719197 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 6 कि.मी अंतरावर मौजा येरला येथे दिनांक 17/01/2021 चे 21.30 वा ते 21.45 वा. दरम्यान आरोपी 1) प्रमोद गमे, 2) माया ठाकरे, 3) सोनाली बाळे, 4) मारता खोब्रागडे 5) सुरेश जुनघरे 6) अनिल काळमेघ, 7) देवा वानखेडे, 8) आशीष राउत, 9) विनोद गजभिये व गावातील 5 ते 6 महिला यांनी अनाधिकृतपणे गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादी नामे– सौ. सरजुबाई देवशंकर वर्मा, वय 51 वर्षे, रा. वार्ड क्र. 1 येरला यांच्या घरासमोर येवुन घरावर दगड फेकुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीच्या अंगणात उभे असलेल्या 6 मोटार सायकल व एक सायकल आणली व प्लॉस्टीक ड्रम कि. अंदाजे 2,52,700/– रू चा प्रमाणे फिर्यादीचे अल्फा मालवाहु 3 चक्का ऑटो आरोपीतांनी फोडफाड करून 14,000/– रू चा प्रमाणे एकुण कि. 2,66,700/– रू चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,148,149,336,435,427,504,506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज खडसे 9421050370 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर